# याचक

दोन अंकी नाटक

## प्रल्हाद जाधव

(या नाटकातील घटना, प्रसंग, पात्रे काल्पनिक असून प्रत्यक्ष जीवनात कोठेही तसे साधर्म्य आढळून आल्यास तो केवळ एक योगायोग समजावा.)

पात्र योजना :

नाथा (४०)

शांताराम (६०)

डांगे (४०)

सीएम (४५)

गोदी  (४०)

अंक पहिला / प्रवेश पहिला

(स्थळ: मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याची मागची बाजू. समुद्रकिनाऱ्या जवळील, डोंगर उतारावरचा बंगला. मागच्या मुख्य दरवाजाला प्रोटेक्शन म्हणून एक छोटे दगडी कंपाऊंड. त्याच्या कॉर्नरला एक लाकडी फाटक. ते ओलांडून खाली उतरता येते. खाली डोंगराच्या उताराचा फायदा घेऊन लँडस्केपिंग केलेले आहे. एकीकडे एक सपाट जागा. तेथे फावल्या वेळात बसण्यासाठी वेताच्या काही खुर्च्या, टी-पॉय. दुसऱ्या टोकाला थोडे खाली एक झोपाळा. मधोमध एक छोटासा कारंजा. भोवती फुले, कंपाऊंडच्या बाजूने विविधरंगी फुलझाडे... सर्वत्र हिरवेगार लॉन... लॉनवर जमिनीलगत सौम्य प्रकाशाचे काही दिवे. कारंज्याच्या पायथ्याशीदेखील वर्तुळाकारात काही दिवे असून त्यांचा रंगी बेरंगी प्रकाश गरजेनुसार कारंज्यातील पाण्यावर पडत रहातो. वरच्या फाटकाजवळ दोन्ही बाजूला शोभेचे दोन दिवे तर खाली रस्त्यावर बाकड्याच्या बाजूला आणि मोरीजवळ नक्षीदार स्तंभावरील प्रकाशदिवे. येथून थोडे खाली आले की रस्त्याला लागून एक लोखंडी गजांचे कंपाऊंड, त्याच्याखाली रस्ता. हा रस्ता रहदारीसाठी वापरात नाही. रस्त्यावर उजव्या कोपऱ्यात प्रेक्षकांकडे तोंड करून बसता येईल असे एक बाकडे. बाकड्याला लागून बूचचे उंच झाड. ते फुलांनी बहरलेले आहे. त्यावर एक दिवा लावलेला आहे. तो दिसत नाही मात्र तेथून अधून-मधून दैवी वाटावा असा सुंदर, नीळसर प्रकाश येत राहतो. डाव्या कोपऱ्यात एक छोटी मोरी... या रस्त्याच्या अलिकडे, म्हणजे प्रेक्षकांच्या बाजूला समुद्रकिनारा – प्रेक्षक म्हणजे समुद्र असे गृहीत धरायचे. हे बरेचसे नाटक या रस्त्यावर घडणार आहे. वरती छोट्या दगडी कंपाऊंडच्या वर मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याची मागची भिंत. तेथे मुख्यमंत्र्यांची बेडरुम असून तिच्या खिडकीतील लाईट गरजेप्रमाणे दिसत रहातो. डिसेंबर महिन्याचा काळ. पडदा उघडतो तेव्हा रात्रीचे सुमारे बारा वाजायला आले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या पार्टीमधील संगीत हळूहळू कमी होत जात आहे. फुलझाडांवरील, कंपाऊंडवरील आणि सीएमच्या बंगल्याच्या भिंतीवरील रोषणाईच्या दीपमाळांतील रंगीबेरंगी दिवे लुकलुकत आहेत. एका बाजूने लंगडत लंगडत नाथा हा भिकारी येतो. वय 40 ते 45 वर्षे. हातात एक काठी. एक बोचके. लेंगा, फाटका सदरा, वर एक जाकिट, मळकट - फाटकी टोपी. अनेक दिवसात आंघोळ नाही. वाढलेली दाढी. अस्ताव्यस्त केस. रस्त्यावर उभा राहून बंगल्याच्या खिडकीकडे पहात तो विव्हळल्यागत भीक मागू लागतो...)

नाथा : गरिबाला भाकर-तुकडा घाला वो मा 555 य... धर्म करा हो माय Sऽऽ माय वो ऽऽऽऽ भाकर-तुकडा घाला वो माय... धर्म करा हो ऽऽऽ माय... (पुन्हा तेच)

शांताराम : (वरचे फाटक उघडून शांताराम खाली येतो. साठीच्या जवळ. मुख्यमंत्र्यांचा इमानी नोकर. पांढरी फुलपॅन्ट, पांढरा शर्ट, टोपी असा गणवेश. भिकाऱ्यावर ओरडत) चल् ए, जातोस का ? काय कटकट लावलीय... चल् हट्...

नाथा : सकाळपास्नं पोटात अन्नाचा कण नाय गेला साहेब...

शांताराम : परत तेच? चालता हो म्हणतो ना... रात्रीचे बारा वाजत आले. ही काय भीक मागायची वेळ हाय का? जेवणखाण करुन लोक झोपूनपण गेले सगळे आन् तू आता जागा झालास ?

नाथा : कायतरी द्या काका... पोटात पीळ पडलाय बघा...

शांताराम : आन् भीक मागायला पण तुला दुसरं कुणाचं घर दिसलं नाय का? डायरेक्ट अगदी मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावरच आलास ते!

नाथा : घरातल्या लायटा दिसत व्हत्या कवाधरनं... नाचगाणंबी ऐकू आलं. तव्हा म्हणलं कायतरी मिळंल हितं... काय उरलं सुरलं असंल तर घाला थोडं गरिबाला...देव... भलं करील तुमचं...

शांताराम : काय सांगतोय मी तुला? पार्टी संपली कधीच ! सगळं सामान सुमान आवरून वेटर लोकपण निघून गेले घरला. आता कुठून आणू तुझ्यासाठी काय ? निघ आता... चल् चल्... साहेब आले तर ओरडतील मला... आजच्या दिवशी इथं कुणी त्रास दिलेला चालत नाय त्यांना.

नाथा : कायतरी मिळंल बघा काका... लेकरं-बाळं सुखी व्हत्याल तुमची...

शांताराम : बऱ्या बोलानं हटायचा नाहीस तू इथनं... पोलिसाला बोलवून आणू का? वेळ झाली साहेबांची आता इकडं येण्याची. जीवाला विसावा मिळावा म्हणून बसतात ते इथं येऊन घटकाभर, त्यात तुझी कटकट नको... चल चल् नाहीसा हो ताबडतोब. (चिडून) अरे चलू म्हणतो ना? कशाला डोकं खातोयंस माझं? (नाथा मनाविरुद्ध काही क्षणापुरता विंगेत जातो आणि शांताराम बंगल्यात गेला असे पाहून पुन्हा बाहेर येत चिकाटीने 'गरिबाला भाकर- तुकडा वाढा वो माय' सुरू करतो. त्याला खूपच भूक लागलेली दिसतेय. अगदी काकुळतीने चालीवर गाणे म्हणावे त्याप्रमाणे हातवारे करत तो भीक मागू लागतो. रोषणाईचे दिवे हळूहळू मंद होत एव्हाना पूर्णपणे विझले आहेत. दुसऱ्या बाजूने हवालदार डांगे काठी ठोकत ऐटीत येतो. चाळीशीतील बेरकी हवालदार. एका हातात टॉर्च, कमरेला वॉकीटॉकी. नाथा दिसताच त्याचं डोकं एकदम तापतं)

डांगे : काय रे, तू परत दिसलास मला इथं ? (धावून अंगावर जात) काय सांगितलं होतं तुला?

नाथा : (काकुळतीने) पोटाला आन न्हाय मिळालं साहेब...

डांगे : पण म्हणून तू इथं? सीएमच्या बंगल्यावर? या शहरातले उकीरडे संपले का काय सगळे ? (भिकाऱ्याची गचांडी धरून त्याला फरफटत दुसरीकडे नेऊ लागतो) चल्...चल् स्साला...

नाथा : मारू नका साहेब, पाय मोडलाय - लय दुखतोय....

डांगे : दुसरा पायपण मोडून टाकतो म्हणजे फिरणंच बंद होईल तुझं... (त्याला खाली आदळत) भोसडीचा साला... तुला एकदा सांगितलं होतं ना की इकडं पुन्हा दिसायचं नाय म्हणून ? सगळे व्हीव्हीआयपी रहातात ह्या एरियात. गव्हर्नर, मुख्यमंत्री, मंत्री... उद्या इकडं काय चोरीबिरी झाली तर पयलं मला फासावर चढवतील साहेब आमचे...

नाथा : म्या चोर नाय साहेब.

डांगे : वर मलाच शहाणपणा शिकवतोयस व्हय? नुसती नजर टाकली तर त्या माणसाची संपूर्ण कुंडली दिसते मला... बघू... बघू ह्या बोचक्यात काय आहे ते ? (बोचकं हिसकावून घेतो आणि रस्त्यावर फेकतो. त्यातून पत्र्याचे दोनतीन डबे, दोनतीन बाटल्या, पेपरचे काही बोळे, एक पातळ पांढरी बेडशीट, डोक्याला बांधायचं एक लाल फडकं, झेंडूच्या फुलांचा एक हार, एक जुना चाकू, गुलालाची पुडी आणि एक छोटी पर्स खाली पडते. त्यातली गुलालाची पुडी आणि पर्स डांगे उचलतो) काय आहे या पुडीत? ( वास घेत) गर्दची पावडर दिसतेय...

नाथा : गर्द नाय साहेब, गुलालाची पुडी हाय ती...

डांगे : आणि ही पर्स कुणाची? मारलेलीच आहे ना? का पर्सचा कारखाना उघडलाय तुझ्या बापानं? बघू आत काय हाय ते... (पाहू लागतो)

नाथा : साहेब ती... ती पर्स माझ्या... माझ्या...

डांगे : 'माझ्या बायकोची हाय... नाय का? (मोठ्यानं हसतो. आतल्या नोटा काढून मोजत). शंभर, दोनशे, तीनशे, चारशे, पाचशे ... वा... कोऱ्या करकरीत आहेत नोटा अगदी... कुठं डल्ला मारलास?

नाथा : साहेब ते... ते... पैशे मी... माझ्या...

डांगे : (तिरकसपणे) तुझ्या घामाचे असतील हे पैसे. मुलांच्या शिक्षणासाठी पाठवायचे असतील... बरोबर? विचार करून ठरव काय खोटं बोलायच ते आणि मग बोल... हरामखोर साला... (स्वतःच्या पाकिटात पैसे ठेवत असतानाच त्याच्या वॉकीटॉकीवर संदेश येतो. वॉकीटॉकीवरची ' टूरटूर' सगळ्यांनाच ऐकू येत आहे. वॉकीटॉकी तोंडाजवळ आणून) हॅलो... येस सर... हो सर... जातो सर... मला वाटतं कोस्टगार्डचं स्टीमर असेल ते... लगेच कळवतो सर... बाकी तसं काही विशेष नाही सर... व्हॅन आलीय आताच सर. हजेरी झालीय, सगळा स्टाफ हजर हाय सर... बंदोबस्ताची काही काळजी नाही सर... येस सर... समजलं सर. नोटेड सर. (वॉकीटॉकी कमरेला लावत नाथाकडे वळून) हे गबाळ आवर तुझं आणि नाहीसा हो इथनं. परत दिसलास तर पिसाळलेल्या कुत्र्याला मारतात तसा गोळी घालून ठार करीन, काय समजलं? (पुन्हा त्याला ढकलून देतो. भिकारी तोंडावर आपटतो. तसाच उठून एकेक वस्तू बोचक्यात भरतो. बोचके खांद्यावर घेतो. काठीवर भार देत एक पाऊल उचलतो. पुन्हा त्याचं लक्ष बंगल्याच्या खिडकीवर जाते. तिथं लाईट सुरू आहे. त्याच्या आशा पल्लवीत होतात. डांगे गेला याची खात्री करून घेत तो पुन्हा प्रयत्न करतो. आता अधिक पिळवटून, अधिक तीव्र, उंच सुरात...)

नाथा : पोटाला भाकर-तुकडा वाढा वो मा SSS य... धर्म करा वो ऽऽऽ माय...

( वरून फाटक उघडून सी. एम. खाली येऊ लागतात. हसतमुख, प्रसन्न, राजबिंडे रूप. अंगावर उंची सफारी. मनगटावर सोनेरी पट्टा असणारे घड्याळ. शिवाय सोन्याची जाड साखळी. त्यांच्या मागोमाग शांताराम)

सीएम : ( येता येता) काय रे काय झालं? कोण ओरडतंय?

शांताराम : (पुढे धावत) हा भिकारी साहेब... हलायलाच तयार नाय. ( भिकाऱ्याला) चलू व्हतोस का चालता?

नाथा : (सी.एम.ना पाहून एकदम फुशारून) गरिबाला भाकर-तुकडा घाला साहेब ... धर्म करा... पोरंबाळं आनंदात हात्याल तुमची, धंद्यात बरकत येईल साहेब....

शांताराम : (चिडत) चेंगटच दिसतोय... तुला किती वेळा सांगू चालता हो म्हणून !...

सीएम : अरे, हो... हो... भूक लागलेली दिसतेय त्याला. जा काहीतरी घेऊन ये, बाईसाहेबांना सांगून...

शांताराम : पण साहेब आता एवढ्या रात्री मी बाईसाहेबांना...

सीएम : सांगितलं तेवढं कर!

शांताराम : बरं साहेब...

नाथा : देव तुमचं भलं करो साहेब...

सीएम : (शांतारामला) आणि हे बघ शांताराम ...

शांताराम : काय साहेब?

सीएम : केकपण घेऊन ये थोडा...

शांताराम : (चमत्कारिकपणे बघत जाता जाता) हो साहेब...

सीएम : सी.एम.च्या वाढदिवसाचा केक काय फक्त पत्रकारांनीच खावा असं आहे का?

नाथा : (हात जोडत) फार उपकार झाले साहेब.

सीएम : उपकार कसले त्यात रोज शेकडो माणसं येऊन खाऊन-पिऊन जातात इथनं... आणि सी. एम. च्या बंगल्यावरून एक भिकारी उपाशी परत गेला हे जर समजलं पत्रकारांना तर उद्या तशी हेडलाईन छापणार नाहीत ते! (वाचत असल्याप्रमाणे) देशातील सर्वात कार्यक्षम आणि श्रीमंत मुख्यमंत्र्यांच्या घरून एक भिकारी उपाशीपोटी परत... (हसतात)

नाथा : (गोंधळून) काय म्हणताय साहेब!

सीएम : काही नाही! तुला कळणार नाही ते!

( नाथा डोकं खाजवत अवघडून उभाच. उभ्या उभ्याच तो सीएमच्या हालचाली न्याहाळू लागतो. सी. एम. लॉनवर फिरु लागतात. फुलांच्या ताटव्यावरुन हात फिरवतात. झोपाळ्याला झोका देतात. खाली येऊन बूचच्या झाडाजवळ उभे राहून मान वर करून सुगंध श्वासात भरून घेतात. तिथून त्यांच्यावर तो सुंदर, नीळसर प्रकाश पडतो. खाली काही फुले पडली आहेत. त्यातली एक-दोन उचलून नाकाला लावतात. (मोरीजवळ)? उभे राहून समुद्राची हवा अंगावर घेतात. समुद्राच्या लाटांचा आवाज येत आहे. याचवेळी ते कवितेच्या या ओळी खुशीने गुणगुणत आहेत. कवितेच्या पहिल्या दोन-चार ओळी गुणगुणता तिचं गाणं होत जातं.)

सीएम : असा हात हाती असावा प्रियेचा

जसा चांदण्याला दिलासा नभाचा

असे यशोगीत ओठी असावे,

असा सूर लागो सुखी जीवनाचा...

असा धुंद वारा, नभी शुक्र तारा

तमाची तमा काय त्याच्यापुढे

तुझ्या अंतरीचा झरा अमृताचा

कसा या क्षणाला लपेटून वाहे ...

जसे पाखरांचे थवे अंबराला

नवे पंख देई धनु श्रावणाचा

तसे यशोगीत ओठी असावे

तसा सूर लागो सुखी जीवनाचा

शांताराम : ( एका ट्रेमधून खाण्याचे काही पदार्थ, केक, पाण्याचे ग्लास भरून घेऊन येतो आणि टी-पॉयवर ठेवतो. तिथेच घोटाळत–) उद्या सकाळी कॅबिनेट आहे साहेब.

सीएम : हो माहिताय. नेहमीप्रमाणे पेपर घेऊन ये सगळे आणि साडेपाच वाजता उठव मला.

शांताराम : जरा बोलायचं होतं...

सीएम : काय?

शांताराम : पांडेसाहेबांचा फोन होता मघाशी. एका पत्रकाराशी बोलत होते. सरबत देताना चोरून ऐकलं मी.

सीएम : काही करत नाही तो पांड्या, जा तू!

शांताराम : सावध राहा साहेब... मला वाटतं काहीतरी कारस्थान चाललंय त्याचं तुमच्या विरोधात...

सीएम : काही होत नाही. सांगितलं ना, जा तू! राजकारण करायचं म्हणजे म्हशींचे तबेले चालवण्याइतकी सोपी गोष्ट नाही हे लक्षात ठेव म्हणावं...

शांताराम : आपली मर्जी साहेब. (नाथाकडं बघत बघत निघतो. नाथा खाऊ की नको या संभ्रमात.)

सीएम : आणि हे बघ...

शांताराम : काय साहेब?

सीएम : (झाडावरच्या लाईटकडे बोट दाखवत) तो लाईट कशाला सुरू ठेवलाय अजून? डोळ्यात येतोय सारखा.

शांताराम : असू द्या साहेब अजून थोडा वेळ. आजचा दिवस वेगळा हाय. एका कर्तृत्ववान मुख्यमंत्र्यांच्या यशाची निशाणी हाय ती आसं समजा.

सीएम : (खूष होत) बरं बरं.. बॉडीगार्ड आणि ड्रायव्हर गेले घरी?

शांताराम : जात नव्हते पण 'साहेब चिडतील' असं म्हटल्यावर गेले.

सीएम : ओ.के.... थँक्यू. (शांताराम जातो. भिकाऱ्याला) अरे असा बघत काय बसलास, घे ते... खा...

नाथा : पण साहेब...

सीएम : (हसत) अरे भूक लागलीय ना? मग घे की!

नाथा : (घाणेरड्या पायानी लॉनवर जायला तो संकोचत आहे.) पण साहेब मी... माझे पाय...

सीएम : पाय घाणेरडे असले तरी काही बिघडत नाही. माळी आहेत साफसफाई करायला. वर ये आणि खाऊन घे. (कवितेची अर्धी ओळ गुणगुणत स्वतःशी) वा! इथं येऊन दोन मिनिटं जरी या समुद्राकडं बघत बसलं तरी सगळं टेन्शन निघून जातं... पुन्हा पुढच्या दिवशीच्या कामासाठी नव्या जोमानं  तयार होता येतं. दिवसभर तो माणसांचा समुद्र अंगावर घेण्याची ताकद मिळते ती या... खऱ्याखुऱ्या समुद्राकडूनच. (स्वत:वरच खूश होत) वा वा क्या बात है! (भिकाऱ्याकडे लक्ष जाते) घे... घे ... खा... अरे घे म्हणतोना! (भिकारी थोडा अविश्वासानेच वरती येतो आणि सॅण्डवीच उचलून उभ्या उभ्या खाऊ लागतो. सीएम उठून त्याच्याजवळ येतात) सावकाश... सावकाश... घे... हा, केक घे... घे ... खा... (त्याला केक देतात. भिकारी बकाबका खातो. सीएम पाणी देतात. तो घटाघटा पाणी पितो आणि बाहीने तोंड पुसतो. आता तो आनंदी, तृप्त, पण संभ्रमित... भडाभड बोलून टाकतो)

नाथा : भगवान आपकी मुराद पुरी करेगा, बालबच्चे खुश रहेंगे, आपलं चौदा चौकड्यांचं राज्य साहेब, दिसामाशी वाढत राहील, आपल्याला पैशाची ददात साहेब कधी पडायची नाही, चौदा विद्या आणि चौसष्ट कला आपल्या घरी पाणी भरतील साहेब... चंद्र-सूर्य हायित तवर तुमचं नाव ऱ्हायील सायेब.

सीएम : (मोठ्यानं हसत) उद्या वर्ल्ड बँकेचे चेअरमन येताहेत. एक हजार कोटी रुपयांची मदत मिळावी असं साकडं घातलंय देवाला. तेवढी मिळो म्हणजे झालं...

नाथा : मिळत्याल साहेब!

सीएम : काय म्हणालास?

नाथा : पैशे मिळत्याल साहेब...

सीएम : तुला कसं काय माहीत? भविष्य - बिविष्य जाणतोस की काय?

नाथा : येतं थोडं थोडं साहेब... खरं म्हजी ज्योतिषी आन् भिकारी एकाच कुळातले...

सीएम : काय म्हणालास?

नाथा : म्हजी बगा, ज्योतिषी आणि भिकारी यांचं कूळ एकच. दोघानाबी गिऱ्हाईक पटवावं लागतं... जाणार एकाच गावाला पर रस्ते येगयेगळे...

सीएम : (मोकळेपणानं हसतात.)

नाथा : आपला इश्वास असो का नसो पण घडायचं ते घडल्याशिवाय राहात नाही... सटवाईचा लेखा कुणाला चुकलाय साहेब?

सीएम : सटवाईचं काय घेऊन बसलास! सगळे मनाचे खेळ नुसते...

नाथा : असं कसं म्हणता साहेब? आता बघा, ' हिमालय पर्वत कालांतरानं नाहीसा व्हईल' असं भविष्य 'नाडीग्रंथात दिलंय का न्हाय?

सीएम : हिमालय पर्वत नाहीसा होईल?

नाथा : व्हय साहेब... आता ह्या गोष्टीवर कोन इश्वास ठेवील का? पन हिमालयाची उंची एका सेंटीमीटरनं वाढल्याची बातमी गेल्या महिन्यात आली होती का न्हाय पेपरात?

सीएम : ( त्याच्या हुषारीने चमकलेले) काय म्हणतोस, हिमालयाची उंची वाढली?

नाथा : तेवढच नाय तर, जगाचा नकाशा बदलणार हाय साहेब... समुद्राच्या जागी वाळवंट आणि वाळवंटाच्या जागी समुद्र आसं चित्रं दिसणार हाय.समदं जग नाहीसं व्हणार हाय एक दिस. भृगू ऋषीनं लिहून ठेवलयं आमच्या!

सीएम : अरे वा, चांगला अभ्यास दिसतोय तुझा... मग सांग पाहू तुला काय भविष्य दिसतंय माझं ते!

नाथा : तुमचा चेहरा नऊ नंबरचा हाय साहेब. कितीबी काम केलं तरी दमत नाय तुमी. करीन ती पूर्व, बसल ती जागा, प्येलं ते पाणी आणि खाल्लं ते अन्न आपलं म्हणून कामाचा गाडा वडत नेण्याचा सोभाव तुमचा! जबाबदारी अंगावर घेऊन पुरी करायची हिंमत हाय सायेब तुमच्यात... गरिबाचा लय कळवळा साहेब तुम्हाला... सोता उपाशी हाल पर ताटातला घास काढून दुसऱ्याला काढून दिल्याबगर चैन पडत न्हाय तुमाला... ( सीएम हसतात) मर्दानी खेळ, संगीत, नाटकाची गोडी हाय सायेब आपल्याला... बरूबर?

सीएम : खरंय तुझं म्हणणं पण वेळ कुठं मिळतोय हल्ली ! गेले ते दिवस... कॉलेजात असताना नाटकात काम करायचो, हॉकी खेळायचो... आता नाही जमत. कधीतरी संगीताची एखादी मैफल होते बंगल्यावर एवढंच, पण तिथंही मधूनंच उठून जावं लागतं... मुख्यमंत्र्यांच्या नशिबात कुठनं आलंय एवढं सुख? आणि म्हणून असा रात्रीच्या वेळी येऊन बसतो इथं कधी वेळ मिळाला तर! विशेषतः आज.

नाथा : स्पष्ट बोलतो म्हणून माफ करा साहेब... (समोरच्या माणसाला क्षणभर घाबरवणं ही ज्योतिषांची एक क्लृप्ती.)

सीएम : बोल, विचार काय ते!

नाथा : नाव काय आपलं साहेब?

सीएम : जयप्रकाश...

नाथा : पाळण्यातलं नाव?

सीएम : काशीनाथ...

नाथा : काशीनाथ... म्हजी (विचार करत) मिथुन रास हाय बघा तुमची.

सीएम : बरोबर!

नाथा : या राशीला साडेसती सुरू हाय सध्या. अंतर्गत शत्रूचा सुळसुळाट झालाय बघा. ज्याच्या खांद्यावर मान टाकावी त्योच गळ्यावरनं सुरी फिरवायला निघालाय हे ध्यानात घ्या.

सीएम : खरंय पण राजकारण म्हटलं की शत्रू आलेच!

नाथा : भीती म्हायीत नाय तुमाला, वाघाचं काळीज हाय तुमच्याजवळ... पर मनात दाबून धरलेलं दुःख आधनं-मधनं भुतावळीसारखं उठतंय आन् हैराण करतंय बघा. त्यामुळंच हितं येऊन बसता तुमी... ल्हान तोंडी मोठा घास घेतो म्हून माफ करा पण मार्ग हाय या दुःखावरचा...

सीएम : बोल... बोल...

नाथा : वर्षभर शनीचं व्रत्त करा सायेब. दर शनिवारी आंघोळ करुन वल्या अंगानं मारुतीला त्याल घाला... उडीद, तीळ, काळं कापड, काळी गाय, लोखंडाचं पात्रं, चपला याचं दान करा. निळ्या खड्याची आंगठी वापरा. शनवारी एक टाईम उपास करुन मुंज्या मुलाला जेवण घाला... दुश्मन हातातलं वढून घेईल पण नशिबातलं नेऊ शकत नाही हे ध्यानात ठिवा साहेब...

सीएम : (मोठ्यानं हसतात) नाव काय तुझं?

नाथा : नाथा... नाथा वैरागी. पाळण्यातलं नाव चौरंगीनाथ. पन समदे मला नाथाच म्हणत्यात.

सीएम : शिकलेला दिसतोयस...

नाथा : हौ साहेब.

सीएम : किती?

नाथा : येतं लिव्हन्या-वाचण्यापुरतं...

सीएम : मग भीक का मागतोस? कुठं तरी काम करावं. मेहेनत करावी, मानानं जगावं... दिली एखादी नोकरी तर करशील श? वाढदिवसाची भेट देतो तुला... बोल!

नाथा : म्हजी साहेब, आज वाढदिवस हाय तुमचा?

सीएम : (होकारार्थी मान हलवत )... शिवाय मुख्यमंत्री झालो त्यालाही तीन वर्ष झाली आज. पत्रकार मागं लागले म्हणून खास पार्टी ठेवली होती...

नाथा : भाग्यवान दिसत्यात हे पत्रकार का कोन त्ये...

नाथा : भाग्यवान कसले, मिंधे एकजात सगळे... बाहेर बाणेदारपणाचा आव आणत फिरतात आणि इथं येताच लोटांगणं घालायला सुरुवात... कुणाला पैसा, कुणाला बदली, कुणाला घर... पत्रकारिता कसली दलालीच ती! जाऊ दे... तुला कळणार नाही त्यातलं काही... तुला हवी का एखादी नोकरी... बोल! शिपाई, वॉचमन... लिफ्ट चालवता येते का तुला?

नाथा : (का कू करू लगतो) आता साहेब नोकरी म्हजी... लिफ्ट म्हजी...

सीएम : (हसत) मला माहिताय तुम्हा भिकाऱ्यांना मेहेनत करायला नको. दुसऱ्याच्या कष्टावर जगायला हवं. फुकटचं खायला हवं. काय, बरोबर की नाही?

नाथा : (त्याला ते पटलेलं नाही.) आसं कसं म्हनता सायेब? आपल्याला कोन्ही काही फुकट–

सीएम : अरे, माणूस उगाच मोठा होत नाही... मुख्यमंत्री असूनसुद्धा अठरा अठरा तास काम करावं लागतं मला. आपलं दरडोई उत्पन्न देशात कुठं नाय एवढं, तीन हजारावर नेलं तीन वर्षात... विकासाचा दर केंद्रापेक्षा जास्त म्हणजे नऊ टक्क्यावर नेला... देशातला सर्वाधिक कार्यक्षम मुख्यमंत्री म्हणून लोक ओळखतात मला... आता परत वरनं - दिल्लीवरनं बोलवतायत. गृहमंत्र्याची जागा मोकळी ठेवलीय... नंतर आणखी वर वर चढत जायचं... गृहमंत्री, उप पंतप्रधान, पंतप्रधान... मनात जिद्द हवी - महत्वाकांक्षा हवी, जीवनाला काही अर्थ असावा, नेमका सूर असावा, काही ध्येय - उद्दिष्ट असावं... कळतंय का काही?

नाथा : (डोकं खाजवत गोंधळ झालाय या अर्थी मान हलवतो)

सीएम : ओके, तुला नोकरी करायची नाही तर दुसरं काहीतरी मागून घे, लक ईज् स्मायलिंग ऑन यू ! बोल, टेन पर्सेटमधलं घर? मुख्यमंत्री निधीतून मदत?

नाथा : पोलीस लय तरास देत्यात साहेब...

सीएम : काय म्हणालास?

नाथा : तेवढं त्यांना सांगितलं तर... भीक मागताना तरास व्हनार नाय.

सीएम : आताच म्हटलं ना मी की भीक मागणं हा गुन्हा आहे म्हणून! 'भिक्षा प्रतिबंधक कायदा' राबवतो आम्ही. 'भिक्षेकरी सुधारगृह' उभारलीत अनेक ठिकाणी. लाखो रुपयांची ग्रँट देतो. एखाद्या सुधारगृहात व्यवस्था करू का तुझी?

नाथा : नगं साहेब... नगं...

सीएम : का रे?

नाथा : आता का म्हजी... मागं दोनचार डाव गेलोतो तिकडं, पन तिथं जेवण नाय मिळत धड का औषधं... वरनं मार मिळतुया... पैकाअडका काढून घेत्यात ते येगळंच...

सीएम : ज्याचं करावं भलं, तो म्हणतो माझंच खरं...

नाथा : भिकाऱ्यांना पोलिसांनी मारू नये असं कायतरी करा तुमी... मिळालेली भीक पोलीस काढून घेत्यात, त्येबी बंद करा... आणि सायेब...

सीएम : काय ?

नाथा : आता आपल्याकडं जी भंगारची दुकानं हैतं की नाही?

सीएम : हां त्यांचं काय?

नाथा : समदी दुकानं मारवाड्यांची हैती. (भाबडेपणानं) तर काही दुकानं मराठी माणसाना मिळत्याल आसं बघा...

सीएम : म्हणजे? काय म्हणायचंय काय तुला?

नाथा : दुकानासाठी जागा बघायचं चाललंय... आज ना उद्या भिकाऱ्याचा धंदा बंद करून भंगाराचं मोठं दुकान काढायचंय सायेब मला...

सीएम : भंगारचं दुकान? (मोठ्यानं हसतात)

नाथा : तुमी सांगितलंत ना आता, काय ते... (आठवत) हां, 'जगण्याला काही उद्देश असावा... मलाबी वाटतं सायेब की आपून भंगारच्या दुकानावर बसलोय... फावड्यानं पैका वढतोय. बायकोला दागिन्यानं मढवलीय, पोरीला फॉरीनला पाठवलीय...

सीएम : (हसत) लग्न झालंय तुझं ?

नाथा : आता आमच्यात तसं लग्न - बिग्न काय नसतं साहेब.

सीएम : मग?

नाथा : आवडली एखादी बाई की राह्याचं संगतीनं...

सीएम : (मान हलवत) आणि मग मुलं?

नाथा : एक मुलगी हाय सायेब. हैद्राबादला हॉस्टेलात ठिवलीय. लय खर्च येतो बघा तिच्या शिक्षणाला. जीव मेटाकुटीला येतूय साहेब... भंगाराचा जोडधंदा सुरू केला तर जमतंय मग समदं, नुस्ती भीक मागून दोन टाईम पोटभर जेवायपण मिळत न्हाय हल्ली... त्यात ते हिजडेपण उतरलेत ना आता आमच्या धंद्यात....

सीएम : हिजडे?

नाथा : आधीच भिकाऱ्यांची संख्या वाढत चाललीय साहेब, त्यात हिजड्यांची भर. आन् ते हिजडेसुद्धा परक्या राज्यातले... हिजड्यांची कमाई जास्ती असती साहेब... त्यांना घाबरतात ना लोक! (समजावून सांगत) रातच्याला सायेब तरुण पोरं- पोरी समुद्रावर येत्यात का नाही? त्यातली एखादी जोडी हेरायची... पोरानं पोरीच्या गळ्यात हात घातला की (ॲक्शन करून दाखवत) 'दे रे बाबा, गरिबाला... धरम करा... दे दो सेठ...' आसं रडगाणं सुरू करायचं... पाच धा रुपयाची गॅरान्टी! भिकाऱ्याला मातर दमडी मिळत न्हाय बघा तिथं... ह्या चौपाट्या हातातनं जातायत साहेब आमच्या आता... ताब्यातच घेतल्यात जणू हिजड्यांनी... या कामात लक्ष घाला साहेब...

सीएम : अरे वेडा झालायस का तू ? मूळात भीक मागण्याचे प्रकार बंद करावे आणि हा प्रश्न कायमचा सोडवावा असा प्रयत्न आहे आमचा. मुंबई स्वच्छ व्हावी, सुंदर व्हावी, झोपडपट्टीमुक्त व्हावी, एड्समुक्त व्हावी हे सरकारच्या समोरचं मोठं आव्हान आहे. प्रचंड पैसा लागणार आहे त्यासाठी. त्यासाठीच वर्ल्ड बँकेची मदत मागतोय आम्ही...

नाथा : आलं लक्षात साहेब !

सीएम : भिकारी ही कोणत्याही विकसनशील समाजाच्या दृष्टीनं एक लांछनास्पद अशीच गोष्ट असते... व्हेरी अन्फॉर्च्युनेट! कलंकच तो एक प्रकारचा!

नाथा : (थोडं चिडून) आसं कसं म्हनता तुमी? येरा गबाळयाचं काम न्हाय ते... चौसष्ट कलांमधी भीक मागण्याच्या कलेचा उल्लेख हाय साहेब.

सीएम : काय अक्कल लागते त्याला?

नाथा : काय अक्कल लागती? भिकाऱ्याला उपजत ज्ञान असावं लागतं साहेब आपल्या धंद्याचं... दांडगा अभ्यास करावा लागतुया परिस्थितीचा... माणसांचा... ॲक्टिंगचं ज्ञानपण असावं लागतंय... भीक मागायची तर एकदम अंगात आल्यागत झालं पायजे... (एका अंत:प्रेरणेनं ओरडत) "अल्लख निरंजन..." असं म्हटलं की खिशात हात गेलाच पायजे समोरच्या माणसाचा...

सीएम : बराच अभ्यास झालेला दिसतोय तुझा...

नाथा : (नरमपणे) आता अभ्यास म्हजी... आमच्या युनियनमधी शिकवतात साहेब.

सीएम : (आश्चर्याने) युनियन आहे तुमची?

नाथा : व्हय... भुसावळला हेडहापीस हाय आमचं... ठेसनातच हाय... दर शुकुरवारी तिथं जमतात लोक आमचे. मंग तिथनंच पुढचं प्लानिंग ठरतं. कोनी कोन्त्या गावाला जायाचं, बाजार कोन्या गावात भरतोय... यात्रा कोन्या गावात भरतीय... मंग जातात लोकं आमची तिकडं.. म्हातारे भिकारी असत्यात त्ये शिकवित्यात तरुण भिकाऱ्यांना. म्हारोग्याची ॲक्टिंग कशी करायची, आंधळ्याची ॲक्टिंग कशी करायची, पोलिसांपास्नं सांभाळून कसं ऱ्हायाचं, शनीसाठी त्याल कसं मागायचं, झालंच तर लचांड कसं लावायचं...

सीएम : लचांड?

नाथा : लचांड म्हायीत न्हाय तुमास्नी? (एकदम रस घेत) एखादं गिऱ्हाईक हेरायचं आन त्याच्या मागं लागायचं. त्याची पॅन्ट पकडायची, बाई असल तर साडी धरायची... गयावया करायची... त्वांड येडंवाकडं करायचं, रडायचं, भेकायचं, ज्याम सोडायचं नाय... हेच लचांड! ‘नस्तं लचांड’ नको मागं म्हनत देत्यात का न्हाय काढून पैशे लोक?

(सीएम हसत हसत आय सी... आय सी...' म्हणत असतानाच हवालदार डांगे काठी आपटत परत येतो. त्याला सीएम दिसतात. त्यांना सॅल्यूट करतो)

डांगे : जयहिंद सर...

(स्वीकारार्थ मान हलवतात.)

डांगे : मी हवालदार एसेस डांगे, सर...

सीएम : आय सी...

डांगे : पेट्रोलिंगवर असतो सर.... हा एरिया सेन्सिटिव्ह आहे म्हणून मुद्दाम इकडं ड्यूटी मागून घेतलीय सर...

सीएम : आय सी...

डांगे : रात्री-बेरात्री जहाजं येतात... गुंड - मवाली, चोर- उचक्के फिरतात... नजर ठेवावी लागते. (नाथाकडं पहात) शिवाय रात्री वेगवेगळे धंदे करणारे आहेतच! (त्याला दम देत) तू अजून इथंच?

नाथा : (सीएमकडे पहात) नाय म्हजी ... म्या... मी...

सीएम : मीच थांबवलाय त्याला, भूक लागली होती...

डांगे : काही दयामाया दाखवण्याच्या लायकीचा नाही हा! (आक्रमकपणे नाथाला ) मुख्यमंत्र्यांचा बंगला म्हणजे धर्मशाळा वाटली का काय रे तुला? तू भेट परत मला...

सीएम : अरे हो, हो... एक भिकारी, काय करणार आहे एवढं?

डांगे : याच्या रूपावर जाऊ नका सर... गर्दची पावडर विकतो हा. मघाशी पुड्या मिळाल्या मला याच्याजवळ. चाकूपण बाळगून आहे हा...

सीएम : असं?

नाथा : (त त प प करत) नाय म्हजी साहेब... चाकू म्हजी साहेब... गुलालाची पुडी...

सीएम : ओके... (डांगेला) डोंट वरी.... आय विल टेक केअर...

डांगे : बरं साहेब... (तिथेच घोटाळतो) एक विनंती होती साहेब...

सीएम : कसली?

डांगे : तुम्हाला इतक्या जवळनं भेटण्याची संधी पयल्यांदाच मिळालीय... (घुटमळतो)

सीएम : बोल बोल...

डांगे : मुंबईत राह्यची सोय नाय साहेब. बायको आजारी असते.... टी.बी.नं... तिला औषधोपचारासाठी नेहमी इकडं आणावं लागतं. एखादं घर मिळालं टेन पर्सेंटमधलं तर फार उपकार होतील... यापूर्वी प्रयत्न केला होता सर पण अधिकारी तुमच्यापर्यंत पोहोचू देत नाहीत सर... (काही क्षण शांतता. सीएमना पेचात घेत) आज तुमचा वाढदिवस.

सीएम : (समजून हसत) ओ.के. ओ. के... असं कर, सकाळी अर्ज घेऊन ये. मंजूर झाला असं समज!

डांगे : ( खिशातून अर्ज काढून सीएमकडे देत) आधीच तयार करून ठेवला होता साहेब. भेट झाली की, चान्स घेऊन बघू असं ठरवलं होतं...

सीएम : ( स्मीत करीत) मुंबईच्या पोलिसाला जगभर का मान आहे ते कळलं आता... आण इकडं... (खिशातून लाल रंगाचा लक्झरचा पेन काढून अर्जावर शेरा मारुन देतात.) उद्या मंत्रालयात सहाव्या माळ्यावर माझ्या सेक्रेट्रीना - दासगुप्तांना दे हा... झालं काम तुझं...

डांगे : (अर्ज हातात घेऊन कडक सॅल्यूट मारत) थँक्यू सर. आयुष्यभर आठवण राहील साहेब तुमची! (नाथाकडे पहात) पण याच्यावर भरवसा ठेवू नका सर... (नाथाला दम देत) तू याद राखून ठेव... परत इकडं दिसलास तर माझ्यासारखा वाईट माणूस नाय दुसरा... ( जातो)

नाथा : (भारावलेला) फार मोठं मन हाय सायेब तुमचं, म्हनलं नाय का म्या मघाच?

सीएम : अरे पण मी काय उपकार करत नाही कुणावर. जनतेचंच आहे सारं काही, ते जनतेला परत देतोय इतकंच! बाय द वे, तू कुठं रहातोस? घर आहे ना तुला?

नाथा : घराची काय गरज आमाला साहेब? आन घर घेतलं तर भीक कशी मिळणार तुमीच सांगा! कुठं एखादं बांधकाम सुरू आसलं आन् एखादा रिकामा पाईप दिसला की घुसतो त्यात. पन तसं म्हनाल तर जीव ग्राण्ट रोड स्टेशनच्या आसपास घुटमळतो बघा. तिथं पुलाखाली तरटाच्या पालात आंग टाकलं की सोर्ग हाती आल्यागत वाटतं बघा... दुसऱ्या दिशी भीक मागायला जोर येतो आणखी... तुमाला जसा हा समुद्र आवडतो तसा आमाला रेल्वेचा पूल....

सीएम : ओके... ठीक आहे.... जाऊ शकतोस तू... मला बसायचंय जरा निवांतपणे... (तो तिथंच उभा) कारे थांबलास कशासाठी? काही बोलायचंय का?

नाथा : (हात जोडून) भिकाऱ्यांना हक्कानं भीक मिळावी यासाठी कायतरी कायदा करा साहेब तुमी...

सीएम : (हसत) तुझा चिवटपणा बघून किती जातीवंत भिकारी आहेस तू ते लक्षात आलं माझ्या! पण भिकाऱ्यांसाठी आणखी काही करता येणार नाही आम्हाला! एकदा सांगितलं ना...

नाथा : धर्मग्रंथात लिवलंय साहेब की आपल्या मिळकतीचा पाचवा हिस्सा पुण्यकार्यासाठी खर्च करावा. गोरगरिबांना मदत होती साहेब, पुण्य मिळतं... आता बघा, श्रीमंत देश तुम्हाला मदत करत्यात का न्हाई साहेब? तुम्ही आताच सांगत व्हता ना; (डोकं खाजवत) काय ते... कोण्यातरी ब्यांकेचं ... हां, ते वर्ल्ड बँकेकडनं मिळणाऱ्या मदतीचं?

सीएम : एड्स निर्मूलन कार्यासाठी गरज आहे त्याची. रेडलाईट एरियात आणि विशेषतः झोपडपट्टयांमधनं जनजागरणाची, नागरी सुविधा पुरवण्याची मोठी गरज आहे.... एवढा पैसा आणणार कुठनं? आधीच कर्ज वाढत चाललंय राज्याच्या डोक्यावरचं...

नाथा : माझं ऐका साहेब. त्यो चेरमन आला की लचांड लावा त्याच्यामागं. पँट पकडून असं मागं मागं जायाचं... (करून दाखवत) हजार कोट रुपये द्या साहेब... देव तुमचं भलं करील साहेब... पोरंबाळं आनंदात हातील तुमची साहेब... (सीएम हसताहेत ) आमच्याकडं दारिद्र्य भारी हाय साहेब... लोकाना खायाला आन्न न्हाय, पियाला पानी न्हाय.. आजाराला औषिधं न्हायीत बघा... एडसनी माणसं  पटापटा मरत्याती बघा... (पुन्हा भिकारी होत) नाय ऐकलं तर पायाला आशी मिठी घालायची (सीएमच्या पायाला मिठी मारत) हजार कोट नाय तर पाचशे द्या साहेब... देव तुमचं कोटकल्याण करील साहेब... गरिबाचा दुवा मिळंल साहेब तुम्हाला... (विव्हळत) द्या हो गरिबाला ... द्या हो गरिबाला... (गाणे गात असल्याप्रमाणे) पाचशे नायतं शंभर द्या... शंभर नायतं पन्नास द्या... पन्नास नायतं धा द्या.... कायतरी द्या साहेब... कायतरी द्या... गरिबाला धर्म करा सायेब...

सीएम : (हसता हसता गंभीर होऊन त्याला झिडकारून लावत) ओ शट् अप... गेट लॉस्ट... स्टॉप दॅट नॉन्सेन्स! आय सेड स्टॉप!

नाथा : (चमत्कारिक खुशीने हसत) बघितलंत साहेब. चिडलात का न्हाय तुमी? आली का न्हाय तुमाला माझी दया? गेला का न्हायी तुमचा हात खिशात?

सीएम : (मान्य करत) खरंच चिडलो मी. ॲन्ड आय लॉस्ट माय टेंपर आल्सो...

नाथा : हे तं काहीच नाय साहेब, हात पाय तोडून टाकलेल्या माणसाचं स्वांग घेऊन संध्याकाळच्या टायमाला एखांद्या ठेसनात पडलो तर दगडाचं काळीज असणारा माणूसबी इरघळतोय बघा... घंट्याभरात चार पाचशे रुपये गेले न्हाय कुठं...

सीएम : आता समजलं तुला नोकरी का नको ती ...

नाथा : कवा कवा तर रस्त्यावर नुसताच झोपून हातो म्या. कवा कवा माझी बायकू... अंगावं एक पांढरी चादर... वर झेंडूच्या फुलांचा हार ... गुलाल टाकायचा थोडा वरनं आन् आपण बाजूला बसून न्हायाचं... घंट्या - दोन घंट्यात हजार-पाचशे रुपये कमाई कुठं गेली नाय बघा... पुरं पाकीट खाली करुन जाणारे दानशूर लोकपण हायेती साहेब सोसायटीमधी...

सीएम : (तिरकसपणे) चांगली कमाई आहे ह्या धंद्यात !

नाथा : तुमी मान्य करा नायतं नका करू पन भिकाऱ्याला जे भविष्य हाय ते नोकरदाराला ऱ्हायलेलं न्हाय सायेब... आन् सरकारी नोकरीच्या मागं लागून लाखो रुपये मातीत घालवण्यापेक्षा भीक मागायचा धंदा काय वाईट? येत्या पाच-धा वर्षात राज्यातली सगळी बेकार पोरं भीक मागायच्या धंद्यात येत्यात की न्हाय बघा तुमी...

सीएम : (नाराजीनं) काय बोलतोयस तू मूर्खासारखं!

नाथा : (भाबडेपणानं खाजगी सुरात) कोनाला सांगनार नसाल तर सांगतो साहेब...

सीएम : काय?

नाथा : धारावीला एक मोठा बॉस हाय आमचा...

सीएम : बरं...

नाथा : इलेक्शन आलं की आमदार-खासदारांना ( आंगठा आणि तर्जनी एकमेकावर घासून पैशांची ॲक्टिंग करून दाखवत.) भक्कम मदत करतोय त्यो !

सीएम : काय म्हणतोस?

नाथा : शंभू महादेवाची शपथ साहेब, खोटं नाय बोलत...

सीएम : (पेचात पकडत) गर्दच्या पुड्या विकून भरपूर पैसे मिळत असतील...

नाथा : काय बोलता साहेब?

सीएम : तो डांगे म्हणाला ना मघाशी तू गर्द विकतोस म्हणून... गर्दचा धंदा असणार तुम्हा मंडळींचा.

नाथा : लय वंगाळ धंदा सायेब... आपन न्हाय करत त्यो ...

सीएम : मग तुझ्याजवळच्या त्या पुड्या?

नाथा : गुलाल हायत्यो.. हवालदाराला वाटलं गर्द हाय म्हून.

सीएम : मला दाखव पाहू...

(नाथा भेदरल्यासारखा 'नगं नगं' म्हणत बोचकं कवटाळून छातीशी धरतो.)

सीएम : का रे, असा घाबरल्यासारखा का करतोयस? आणि ते बोचकं... एवढं छातीशी कवटाळून कशाला धरतोयस? दाखव बरं काय काय आहे त्यात ते? आण!

नाथा : काय नाय साहेब... कागद... रद्दी ...

सीएम : अरे मग रद्दी एवढी छातीशी कवटाळून धरायला काय झालं? आण, दाखव बघू... बघू... दाखव !

(सीएम त्याच्या हातातलं बोचकं काढून घेऊ पहातात. तो 'नगं नगं' म्हणत विरोध करतो. त्याच्या हातून ते खाली पडतं आणि त्यातलं सामान विखरून पडतं. तो घाईघाईने सर्व सामान उचलून बोचक्यात बांधतो. सीएम एक पुडी उचलून उघडून पाहात 'अरे खरंच गुलाल आहे या पुडीत...' असं म्हणत ती पुडी बोचक्यात ठेवतात. दरम्यान नाथा कागदाचा एक बोळा लपवल्यासारखा छातीजवळ धरतो.)

सीएम : आणि त्या कागदात काय आहे?

नाथा : काय नाय साहेब.

सीएम : मग असा लपवतोयस काय त्यात एवढं? बघू...

नाथा : काय नाय साहेब, तुमी नका बघू साहेब... म्हेरबानी करा साहेब... वडा-पाव घेतलाता त्यो कागुद हाय साहेब...

सीएम : (तो कागदाचा बोळा काढून घेतात. उघडतात.) यात तर काहीच नाही, मग मग इतका घाबरलास का ?

नाथा : त... त... त्यावर, ती... ती... बातमी...

सीएम : कोणती बातमी?

नाथा : ती बघा साहेब तिथं, मोठ्या अक्षरात छापलेय ती...

सीएम : कोणती? बघू... (पाहू लागतात)

नाथा : त... तुमी खुनी आहात असं लिवलंय त्यात.

सीएम : (धक्का बसून) काय?

नाथा : तुमी खुनी आहात असं छापलंय त्यात...

(संगीत... सी.एम. चमकतात पण लगेच भानावर येतात. पेपर बारकाईनं पाहतात.)

सीएम : विरोधी पक्षाचा पेपर आहे हा. आम्हाला बदनाम करण्यासाठी असे काही ना काही उद्योग करावेच लागतात त्यांना ! ( आतून अस्वस्थ झालेले) कुठं मिळाला हा तुला?

नाथा : सांगिटलं नव्हं का आता... वडा-पाव घेतलाता... त्याचा...

सीएम : (उद्वेगानं ) मघाशी म्हटलं ना मी... यांना कितीही दूध पाजा, शेवटी जातीवरच जाणार... प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाणारे लोक आहेत हे....

नाथा : कोण साहेब?

सीएम : दुसरं कोण? पत्रकार ... ' साह्यबां'नी बरोबर ओळखलं होतं त्यांना. 'साप' आणि 'विंचवाची अवलाद' म्हणून जागा दाखवली होती, काही खोटं नव्हतं त्यात...

नाथा : पर पत्रकारांनी काय केलं साहेब तुमाला?

सीएम : त्यांना वाटतं राज्य आपणच चालवतो... बैलगाडीखालनं चाललेल्या कुत्र्याला वाटतं ना की बैलगाडी आपल्यामुळंच चालतेय, त्यातला प्रकार... ( अंदाज घेत) पण काय रे?

नाथा : काय साहेब?

सीएम: ही बातमी... तू सोबत जपून कशाला ठेवलीस?

नाथा : म्हजी साहेब... म्हजी आता... कसं... हिकडं न्हेमी येतो... तवा इचार केला आज ना उद्या गाठ पडंल. सावध करता येईल तुमाला. जवळ असू द्यावी...

सीएम : : खरं बोलतोयस तू?

नाथा : शंभू म्हादेवाची शपथ खरं सांगतो साहेब!

सीएम : पण मला सावध करण्यात तुझा काय फायदा?

नाथा : आता खरं सांगायचं तर साहेब, भंगारचं दुकान टाकण्यासाठी मला कुर्ला ठेसनजवळ जागा हावी साहेब... त्या कामात म्हटलं आपली मदत व्हईल कवातरी...

सीएम : माझी मदत?

नाथा : खालचे हापीसर फार लबाडी करत्यात साहेब. दरयेळी हजार- पंधराशे घेत्यात आन् हाकलून लावत्यात... तवा म्हणलं एकदाच काय ते मोठ्या साह्यबाला भेटून ... (कमरेचा कसा चाचपतो)

सीएम : काय मोठ्या साहेबाला भेटून?

नाथा : (विचार बदलत) काय नाय साहेब...

सीएम : बोल... बोल...

नाथा : खरंच काय नाय...

सीएम : मग असा कावरा बावरा का झालायस?

नाथा : (पुन्हा कमरेचा कसा चाचपत) तुमी कावणार नाय ना साहेब?

सीएम : नाही.

नाथा : वाईट वाटून नाय घेणार ना?

सीएम : अजिबात नाही.

नाथा : (जांघेतून करगोट्याला बांधलेली एक पिशवी बाहेर काढतो आणि तिच्या तोंडाची गाठ सोडून आतून नोटांची बंडलं बाहेर काढून सीएमसमोर धरतो) घ्या साहेब... नाय म्हणू नका...

सीएम : अरे पण काय आहे ते?

नाथा : दोन लाख रुपये हायेत साहेब...

सीएम : दोन लाख? (संगीत) कुठनं आणलेस एवढे पैसे?

नाथा : म्हेनतीची कमाई हाय सायेब... रगत वकून मिळवलाय हा पैका... घ्या... नाय म्हणू नका...

सीएम : हे पैसे घेऊन काय करू मी?

नाथा : भंगाराचं दुकान टाकायला जागा मिळवून द्या साहेब... कुर्ला ठेसनाजवळ जागा मिळाली तर एका वर्षात नवकोट नारायण व्हईल माझा... (संगीत) फार उपकार व्हतील साहेब... गरिबावर एवढी कृपा करा साहेब... आज तुमचा वाढदिवस हाय. नाय म्हणू नका साहेब...

सीएम : तू लाच देतोयस मला...

नाथा : लाच म्हणू नका साहेब... राजा, देव आणि गुरू यांना भेटायला जाताना रिकाम्या हातानं जाऊ नये आशी शिकवणच हाय आपल्या सौंस्कृतीची...

सीएम : (चक्रावलेले)

नाथा : युनियनमधीपण शिकवतात साहेब आमच्या. पोलिसांना तर रोजच पैशे द्यावे लागतात साहेब आमाला. घ्या सायेब... तुमच्या डोक्यावर आधीच कर्ज हाय सायेब...

सीएम : (हळूहळू तापत आहेत.)

नाथा : (भाबडेपणाने) आजून हावे पाच-पन्नास हजार तर देतो आठ धा दिसात जमवून... गरिबाला मदत केली तर पुण्य मिळल साहेब, पाप धुवून जाईल साहेब... घ्या साहेब...

सीएम : (एकदम तोल सुटून नाथाची गच्ची पकडतात) हरामखोर साला... माझं पाप धुवून काढायच्या गोष्टी करतोयस? मला पैसे देतोयस? मला? एका राज्याच्या मुख्यमंत्र्याला? तुझा संशय आधीपासूनच येत होता मला... बोल कोण आहेत तू? ( धारदारपणे) खरं बोल!

नाथा : भिकारी हाय म्या... शंभू महादेवाची शपथ साहेब, जातीवंत भिकारी ! माजा बा भिकारी, माजी आय भिकारी, माझा आज्या तर 'भिकारी युन्यन'चा चेरमन व्हता साहेब...

सीएम : खोट बोलतोयस तू...

नाथा : तुमचं म्हणणं खरं झालं असतं तर पेढे वाटले असते म्या साहेब... (संगीत) लहानपणी बा भीक मागाय लावायचा... मला आवडायचं न्हाय ते.... शाळा आवडायची मला. पैला नंबर असायचा माजा वर्गात. भीक मागाय लागू नये म्हणून म्या पळून जायचो... एक दिस बाला राग आला... त्यानं शाळेतनं मला फरफटत घरी आनलं आन पायच काडला माजा साहेब...

सीएम : पाय काढला? कोणता बाप पाय मोडेल आपल्या स्वतःच्या मुलाचा?

नाथा : भिकाऱ्याच्या यवसायात दयामाया ठिवून चालत न्हाय सायेब... ह्यो बघा (लेंगा वर करून दाखवतो. पायावर घाणेरडा मळकट फडका गुंडाळलेला. त्यावर रक्ताचे डाग. सीएमना थोडी दया आलेली.) पटलं साहेब? आता माझं नाव–

सीएम : नाथा... मूळ नाव चौरंगीनाथ...

नाथा : बरूबर. पण तुम्ही 'नवनाथ कथासार' वाचलाय का? हातपाय तोडून टाकलेलं एक प्वार उकीरड्यावर सापडतं... त्याचं नाव चौरंगीनाथ... चौरंगीनाथाचे हातपाय त्याच्या सावतर आईनं मोडले, माझा पाय माझ्या बानं मोडला... त्याच्यासारखं मीबी नाव कमवावं म्हणून बानं माझं नाव चौरंगीनाथ ठिवलं... बारा वर्ष तप

केल्यावर सिध्दी मिळाली चौरंगीनाथाला ... पर म्हातारपण आलं तरी माझा मोडलेला पाय काय परत मिळाला न्हाय बघा. बानं तसंच उचललं आनं (करून दाखवत) आसं माझं धड उचलून रेल्वे ठेसनात आणून टाकलं, भीक मागायचा मंत्र कानात सांगीटला... आन बा तिकडं लांब कोपऱ्यात जाऊन उभा राह्यला... गंमत बघत... त्या पैल्याच दिवशी पाचशे रुपये कमाई झाली साहेब.. हे बघा ... हे बघा डोक्याला असा रुमाल बांधलेला... असं हात पाय मुडपून घेतलेल आनं सुरू... ( केविलवाण्या - भेसूर आवाजात ओरडणे सुरू करतो आणि त्याच ठेक्यावर धड उडवायला लागतो) अल्ला ऽऽऽ... अल्ला ऽऽऽ ए अल्ला ऽऽऽऽ, अल्ला ऽऽऽ दे अल्ला ऽऽऽ अल्ला ऽऽऽ अल्ला ऽऽऽऽ (शांताराम धावत खाली येतो.)

शांताराम : काय झालं साहेब?

सीएम : काही झालेलं नाही. तू कशाला आलास इथं?

शांताराम : (संशयानं पहात) आणि असं काय करतोय हा?

सीएम : तुला कळणार नाही ते, तू जा आणि झोप शांतपणे. काही काळजीची गरज नाही.

शांताराम : बाईसाहेब म्हणाल्या ओरडतंय कोण बघून ये... आणि तुम्हाला बोलवताहेत त्या...

सीएम : येतो म्हणून सांग त्यांना... येतो मी, तू जा!

शांताराम : पण आता रात्र खूप झालीय साहेब... (आपल्या मालकाला त्रास होतोय हे समजून तो चार्ज झालेला आहे)

सीएम : एकदा सांगितलं ना तू काळजी करू नको माझी... (दिव्याकडे बोट दाखवत) आणि तो लाईट बंद कर आता.

शांताराम : ( नाथाकडे रागाने पाहात.) हा भिकारी म्हणजे मला वाटतं... हा काहीतरी भानामती करणारा नायतं चेटक्या असावा साहेब!

सीएम : कसली भानामती? माझा काही विश्वास नाही असल्या गोष्टींवर. अंधश्रद्धा निर्मूलनाचं बिल आणतोय ना आपण?

शांताराम : तुम्ही काही म्हणा साहेब, मला पटत नाय तुमचं हे वागणं... (एकदम नाथावर झडप घालून ' काय रे भडवीच्या, होतोस का इथनं चालता' (असं म्हणत त्याला फरफटत घेऊन जातो. त्याच्या थोबाडीत देतो. नाथा "नको रे काका... पाय मोडलाय काका... अल्ला, अल्ला... अल्ला ऽऽऽअल्ला ऽऽऽ नको रे काका...' असे ओरडतच आहे. त्याला विंगेत फेकून येतो. हात झटकत) मला पैल्यापास्नं संशय होता साहेब, हा माणूस काहीतरी गडबड करणार म्हणून...

सीएम : अरे पण काय कसली गडबड केलीय त्यानं काही करत नव्हता तो... चिडलास त्याच्यावर एकदम? का मारलंस त्याला?

शांताराम : तुमाला सगळ्यांचा कळवळा साहेब... चला आता झोपायला... माझं म्हाताऱ्याचं ऐका... थंडीपण पडाय लागलीय. (काही क्षण शांतता. संगीत. वडिलकीच्या नात्यानं) चलता का नाय आता? कशाला टकुरं फिरवून घेताय साहेब विनाकारण?

सीएम : आजचा दिवस माझा एकट्याचा असतो हे माहिताय तुला! (संगीत) पण खरं सांगायचं तर माझी शांतता पार नाहीशी करून टाकलीय त्यानं...

शांताराम :   तरी मी सांगत होतो तुम्हाला...

सीएम : तुझा विश्वास बसणार नाही पण त्यानं मला....

शांताराम  : काय?

सीएम : ही वॉन्टेड टू ब्राईब मी... मला लाच देऊ केली...

शांताराम : काय म्हणता?

सीएम : डोकं भणाणून गेलंय अगदी...

शांताराम : पण तुम्ही तर साहेब आयुष्यात कधी हरामाची दिडकीपण घेतली नाय कुणाची. गोर-गरीब, भंड-भिकारी कोणी तुमच्याकडनं कधी रिकाम्या हातानं गेला नाय... आम्ही आमच्या डोळ्यानं बघितलंय... 'मुख्यमंत्री निधी' म्हणजे तर चौकातल्या पाणपोईसारखी खुली केली तुम्ही... कुणीही यावं आन् पाच-पन्नास हजार घेऊन जावे...

सीएम : तेच म्हणायचंय मला पण काय उपयोग झाला त्याचा?( काही क्षण शांतता) तू असं कर शांताराम...

शांताराम : (सीएमच्या मनातलं ओळखत) तुमच्यासाठी एक पेग भरून आणू...

सीएम : बरोबर ओळखलंस.

शांताराम : ओळखणार नायतं काय साहेब? गेली तीन वर्ष सावलीसारखा सोबत हाय तुमच्या... (थांबून) पण सकाळी कॅबिनेट हाय साहेब....

सीएम : आय नीड टू रिलॅक्स. एक पेग फक्त... जा लवकर!

शांताराम : हो साहेब. (निघत) पण बाईसाहेबांना काय सांगू साहेब?

सीएम : येताहेत म्हणावं साहेब, झोपायला सांगितलंय... आणि तो लाईट बंद करायला विसरू नको, डोळ्यात येतोय सारखा...

शांताराम : राहूद्या ना साहेब थोडा वेळ... लक्ष्मी वाट चुकली तर आपल्याच बंगल्यात यावं लागेल तिला... उद्याच वर्ल्ड बँकेचे चेअरमन येताहेत साहेब... ओके... ओके... (शांताराम जातो. चांदणे पडू लागले आहे. लाटांचा आवाज. रातकिड्यांची किरकीर. सीएम अस्वस्थपणे येरझारा घालत आहेत. त्यांच्या खिशातील मोबाईल वाजतो.)

सीएम : (मोबाईलवर) हां... बोला दासगुप्ता ... नो प्रॉब्लेम, बोला... बोला... झाली तयारी? ओके... व्हेरीगूड! अर्ध्या तासात आटपू मिटिंग... नंतर जेवण. चांगलाच इम्प्रेस झाला पाहिजे तो चेअरमन हे लक्षात ठेवा, काय? नंतर कॅबिनेट आणि संध्याकाळी रत्नागिरी... हो हो... ते कोकण विकासाचं पॅकेज म्हणजे गंमतच वाटते आमदारांना... पण एकदम सहाशे कोटी आणणार कुठनं? पन्नास कोटी दिलेत म्हणून उद्याच्या प्रेस कॉन्फरन्समध्ये जाहीर करतो, वित्त सचिवांशी बोलून घ्या तुम्ही.ओके. ओके... बाकी काय?  (थांबून) नाही नाही... अनधिकृत झोपड्या तोडायची मोहीम कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाही आता... जितक्या झोपड्या जास्त तितके प्रॉब्लेम जास्त ... टी.बी., एड्स... कुपोषण... कशा कशाशी सामना करणार? आयुक्तांना सांगा तुम्ही, हवं असल्यास माझ्याशी बोलायला सांगा... शासन पाठीशी आहे म्हणावं तुमच्या... काय ? पेपरवाल्यांना बोंबलू द्या हो, त्याची काळजी करू नका तुम्ही... पूर्वी गुंड - मवाली सुपाऱ्या घ्यायचे,

आता संपादक सुपाऱ्या घेऊन लिहितात इतकाच फरक ! जाऊ द्या... डोंट वरी... ओके... गूड नाईट ! (मोबाईल बंद करून खिशात ठेवतात. शांताराम एका ट्रेमध्ये बाटली - ग्लास आणि शेंगदाणे - काजूची बशी घेऊन येतो. पेग तयार करून ठेवतो. त्याने सोबत एक शालही आणलेली आहे.)

शांताराम : ही शाल घ्या साहेब, अंगावर ! थंडी वाढत चाललीय...

सीएम : (शाल हातात घेत) ओके... तू जा, पड आता थोडा वेळ...सकाळी लवकर उठायचंय...

शांताराम : हो, पण तुमचं लवकर आटपा साहेब...

सीएम : (झटक्यात अर्धा ग्लास रिकामा करतात) जा तू... माझी काळजी करू नको.

शांताराम : काळजी मी नाही, तुम्ही करतायं साहेब.

सीएम : कशावरनं म्हणतोस असं?

शांताराम : अर्धा ग्लास एका झटक्यात संपवला तुम्ही...

सीएम : (हसत) कळली तुझी अक्कल!

शांताराम : खरं सांगू साहेब?

सीएम : (पाहातात)

शांताराम : तुम्हाला पटणार नाय पण त्या भिकाऱ्यापेक्षा पांडेसाहेबांनी झोप उडवलीय तुमची...

सीएम : पुन्हा विषय काढलास तू त्या पांड्याचा ...

शांताराम : हे केस उन्हाने पांढरे झाले नाहीत साहेब... तुम्हाला भीती वाटतेय त्याची.

सीएम : मी कशाला घाबरु त्याला!

शांताराम : माफ करा साहेब, पण... कॅबिनेट मिटिंगमध्ये धक्काबुक्की केली त्यानं तुमच्याशी, काय इज्जत राहिली?

सीएम : तुला कसं माहीत?

शांताराम : चाळीस वर्ष झाली साहेब. या बंगल्याच्या दगड, विटा आणि मातीसुद्धा बोलते माझ्याशी. कॅबिनेटमधल्या बातम्या तर काय जशाच्या तशा छापून येतात पेपरात.

सीएम : खरं आहे तू म्हणतोस ते... खरं म्हणजे कॅबिनेटमधली चर्चा बाहेर जाऊ द्यायची नाही असा संकेत आहे पण (थांबून) रांडा ठेवाव्या तसे पत्रकार ठेवलेत मंत्र्यांनी...

शांताराम : ते पांडेसाहेब तर सारखे पत्रकारांच्या गराड्यात असतात... मला काय भला माणूस वाटत नाय तो. तुम्ही सांभाळून राहा साहेब...

सीएम : (चिडून) तू सल्लागार नाहीस माझा, नोकर आहेस...

शांताराम : इंदिरा गांधींना त्यांच्याच सिक्युरिटीच्या माणसानं मारलं हे विसरू नका...

सीएम : त्या पांड्याची एवढी हिंमत होईल असं वाटतं तुला? आम्ही थारा दिला त्याला मुंबईत. तबेल्यांची जागा कायदेशीर करून दिली. तिकीट दिलं,आमदार, मंत्री केलं.

शांताराम : पण शेवटी काय झालं? हाय-कमांडला तोच लाडका झाला का नाय?

सीएम : हे पण कळलं तुला?

शांताराम : सगळ्या जगाला माहितीय साहेब. तुम्हीच डोळ्यावर झापडं ओढून बसलाय. म्हैन्यातले पंधरा दिवस दिल्लीला जाऊन बसलेला असतो तो. बॅगा सोबतच असतात...

सीएम : पण आम्ही काय कमी केलं हाय कमांडला?

शांताराम : बिल्डरांना जमिनी विकल्या त्यातला वाटा मिळाला नाय अशी चर्चा हाय... पाचशे कोटी रुपयांची रक्कम तुमी मधल्या मधी हडप केली असं सगळयांना सांगत फिरतायत पांडेसाहेब... मघाशी त्या पत्रकाराचं हेच बोलणं चाललं होतं त्यांच्यासोबत.

सीएम : पण हाय कमांडला डोळे नाहीत का? रक्ताचं पाणी करतोय मी म्हणून ही आजची स्थिती आहे राज्याची. नाही तर काय झालं असतं आज? रात्र बघितली नाही की दिवस.... बैलासारखं कामाला वाहून घेतलं... नियोजन मंडळाला परोपरीनं समजवून सांगावं लागलं, प्रसंगी केंद्राशी संघर्ष केला... जिद्दीनं प्रकल्प मिळवले... कित्येक कोटी रुपयांचा निधी खाजगी गुंतवणुकीद्वारे उभा केला. देशातच नव्हे तर जगात महाराष्ट्राचं नाव व्हावं हा ध्यास घेतला.... शेती, पाणी, रस्ते, धरणं, काही करायचं बाकी ठेवलं नाही... नवनवं तंत्रज्ञान आणलं... ढग अडवून कृत्रिम पाऊस पाडला... मातीतंन सोनं निघू लागलं...

शांताराम : पण त्या सोन्याच्या खाणीला तुमी आपलं स्वत:चं कुलुप लावलं...

सीएम : शांताराम ऽऽऽ...

शांताराम : असं पांडेसाहेब सगळ्यांना सांगत फिरताहेत हल्ली.

सीएम : हरामखोर साला... बाहेरच्या राज्यातला म्हणून त्याला कधी अस्पृश्य मानलं नाही. एका ताटात जेवलो, होम डिपार्टमेंट दिलं....

शांताराम : (उघडं पाडत) हाय कमांडचे आदेश होते, त्यांना होम द्या म्हणून...

सीएम : हेही माहिताय तुला?

शांताराम : थोडातरी विरोध करायला पायजे होता साहेब तुमी. असंच दबून राह्यलात तर हळूहळू ताब्यात घेईल तो सगळा कारभार... उद्या मुंबईसुद्धा महाराष्ट्रापासून तोडायला कमी करणार नाही तो... (संगीत)

सीएम : मी इतका दूधखुळा नाही म्हणावं... तू बघ... लवकरच कसं पितळ उघडं पडतंय त्याचं ते...

शांताराम : त्या आधी तोच तुमचं पितळ उघड पाडणार नाही याची काळजी घ्या साहेब.

सीएम : स्वप्नं बघत रहा म्हणावं... मी काही कच्च्या गुरूचा चेला नाही, चौथी पिढी आहे आमची राजकारणातली...

शांताराम : तुम्ही खुनी आहात–

सीएम : काय म्हणालास?

शांताराम : असा नवा मुद्दा काढलाय पांडेसाहेबांनी आता.

सीएम : मला खड्ड्यात घालण्याचे सगळे प्रयत्न फसले त्याचे म्हणून या पातळीवर उतरलाय तो आता. (संयम राखत) जाऊ दे... लोकशाही आहे आपल्याकडं... प्रत्येकाला आपली मतं मांडण्याचं स्वातंत्र्य आहे... शिवाय राज्याची बेइज्जती होऊ द्यायची नाही मला...

शांताराम : बेइज्जत व्हायची राहिलीय कुठं साहेब? सोन्याचा धूर निघत होता या भूमीतनं. काठीला सोनं बांधून फिरायची माणसं. चिमूटभर माती उचलून कपाळाला लावली तरी पावन झाल्यासारखं वाटायचं... पण काय वारसा न्हायला तिचा साहेब आता? एकीकडं गरिबांच्या झोपड्या जळतायत आणि दुसरीकडं बिल्डरांच्या इमारती उभ्या हातायेत... श्रीमंत माणूस अधिक श्रीमंत आणि गरीब माणूस अधिक गरीब होत चाललाय असं नेहरू म्हणाले होते... नेहरू गेले आणि ती दरीपण वाढत गेली... गोरगरीब, कष्टाळू, प्रामाणिक, निष्पाप माणसं देवानं जन्माला घातलीत ती अन्याय आणि हालअपेष्टा सहन करण्यासाठीच असं वाटतं बघा कधी कधी मनाला... कुठं काही संकट आलं तर त्यात पहिला बळी जातोय तो गरीब माणसाचा... समुद्राचं पाणी शिरलं मुंबईत आणि जगबुडी झाली तर गोरगरीबाची प्रेतं पाण्यावर आणि श्रीमंतांची हेलीकॉप्टरं हवेत तरंगताना दिसतील साहेब... (थोडं थांबून) फार बोललो असलो तर माफ करा... तुमच्या हातनं काहीतरी चांगलं घडणार आहे असं वाटतं म्हणून बोललो, नाही तर इतक्या वर्षात कधी तोंड उघडलं नव्हतं... (शांताराम शाल त्यांच्या अंगावर घालून निघून जातो. सीएम ग्लास उचलतात आणि एक मोठा घोट घेतात. एखादा शेंगदाणा तोंडात टाकतात. थोडा वेळ गेला आहे हे दर्शविणारा प्रकाश. रात्र चढत चाललेली. रातकिड्यांचा आवाज... एवढ्यात रस्त्याच्या डावीकडून एका बाईची किंकाळी आणि दोघा-तिघांची बाचाबाची ऐकू येते.)

गोदी : (विंगेतूनच) मुडदा मेला... खिशात पैका न्हाय तर कशापायी मिशीला तूप लावून फिरतो रे भाड्या ? आन... आन हिकडं पाकीट ... बघू काय हाय आत ते !

आवाज : ( विंगेतूनच ) ए SS अरे SSS क्या करती है ? छोडो... छोडो ऽऽऽ

गोदी : पैसे निकाल पहले... माल तो बहुत दिखता है अंदर... हे दोनशे रुपये...

आवाज : अबे छोड साली...

गोदी : भागता है क्या रे गांडू ? अगली बार मत दिखना यंहा... क्या?

डांगे : (विंगेतूनच ) क्या तमाशा लगा रक्खा है ? क्या है रे ? उठ भोसडी के... उठो... (काठीने मारल्याचा आवाज)

(डांगे तिला धरून तिच्याकडचे पैसे काढून घेत आहे)

गोदी : अब तू आया क्या? छोड छोड... दिया ना पैसा एकबार ... क्या करता है?

डांगे : जादा बक्बक् करती है रंडी साली....

गोदी : छोड बे साले... हराम की कमाई खाता है गांडू...

डांगे : (गोदीला फरफटत स्टेजवरच्या रस्त्यावरून दुसरीकडे नेऊ लागतो) अभी दिखाता मै तेरेकू ... जादा श्यानपती सिखाती है... हमदर्दी दिखाने के लायक नही तुम लोग!

(गोदी. पस्तीस-चाळीशीतील. कधीकाळी सुस्वरुप असेल अशी पण आता पार रया गेलेली... तोंडात पान, भडक मेकप. तोंडावर त्वचेच्या गंभीर आजारामुळे पडलेले डाग.... विस्कटलेल्या झिंज्या... खांद्याला पर्स...

तिला पोलिस स्टेशनला घेऊन जाण्याचा डांगेचा बेत आहे पण ती मध्येच “सोड... सोड की रे मुडद्या” म्हणत हिसका देऊन स्वतःला सोडवून घेते...)

डांगे : हरामजादी साली...

गोदी : हरामजादा तेरा बाप. रंडी की कमाई खाता है, शरम नही आती? किडं पडतील तुझ्या अंगात भाड्या... थू! (सीएम अवाक् होऊन हा प्रकार पहात आहेत.)

सीएम : (डांगेला) अरे काय चाललंय? कोण आहे ही?

डांगे : रंडी है साब... धंदा करती है इधर... पन्नास वेळा जेलमधी टाकली साहेब पन भायेर आली की पुन्हा लागती धंद्याला... चोरीपण करती साहेब.

गोदी : चोर होगा तेरा बाप...

डांगे : (हवालदार बेभान होऊन तिच्या थोबाडीत देतो. ती कोलमडून पडते.)

सीएम : अरे अरे अरे ! काय करतोयस तू हे? बाईवर हात उचलतोस? आणि तेही माझ्यासमोर?

डांगे : माफ करा साहेब, मला भान राहिलं नाही... व्हेरी सॉरी... पण असंच वागावं लागतं यांच्याशी. मला वाटलं तुम्ही झोपले असाल म्हणून या रस्त्यानं आणली हिला, नाहीतर किनाऱ्यावरनंच हाकलत नेली असती... चल गं ... (तिच्या दंडाला धरून ओढत नेत) हिला अंदर करून येतो साहेब... आठ दिवस काढले आत की मस्ती जरा कमी व्हईल सालीची... बरं झालं, पोलिस व्हॅन लवकरच आली आज. चल्... चल... हरामजादी...

गोदी : (कण्हत ) ओ माऽऽऽ, आये... आये गं ऽऽऽ, वाचवा ऽऽऽ वाचवा ऽऽऽ कोई बचाव ऽऽऽ...

(गोदी दोन्ही हात वर करून मदतीसाठी याचना करीत आहे. डांगे तिला ओढत ओढत रंगमंचाच्या मधोमध आणतो तोवर हळूहळू अंधार. पडदा.)

**मध्यंतर**

***

(या नाटकाची पूर्ण संहिता ज्यांना हवी असेल त्यांनी संकेतस्थळी दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. या नाटकाचे प्रयोग, भाषांतर-रूपांतर, त्यावर आधारित दूरदर्शन मालिका, चित्रपट, टेलिफिल्म यासारख्या अन्य माध्यमातील रुपांतरासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. या नाटकातील कोणताही भाग, मुद्रित वा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमात कोणत्याही पद्धतीने वापरावयाचा झाल्यास त्यासाठीही लेखकाची पूर्व-परवानगी घ्यावी.)

***